# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कापसाच्या पिकासाठी तण निवारण करणारे राउंड अप रेडी तंत्रज्ञान लागवडीसाठी उपलब्ध करून देणेबाबत

**(१) ३१०४ (२२-१२-२०१४). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कापसाच्या बीटी लागवडीमुळे तणाचे प्रमाण वाढल्यामुळे व मजुरांच्या तुटवड्यामुळे शेतकरी त्रस्त असून तण निवारण करणारे राउंड अप तंत्रज्ञान लागवडीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी जालना तालुक्यातील शेतक-यांनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या तंत्रज्ञानाचा फायदा परदेशी प्रगत राष्ट्राबरोबर देशातील शेजारच्या राज्यातही परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, हे तंत्रज्ञान देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) याबाबत माहिती उपलब्ध नाही.
(३) जनुकीय परिवर्तीत पिकांच्या नियंत्रीत क्षेत्रीय चाचण्या कृषित विद्यापीठ प्रक्षेत्रावर घेण्यासाठी शासनाकडून खाजगी कंपन्यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सदर क्षेत्रीय चाचण्या पूर्ण झाल्यानंतर आणि संशोधनाच्या निष्कर्षाच्या आधारे तण निवारण करणारे राउंड अप तंत्रज्ञान लागवडीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत पुढील आवश्यक ती उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा विधानसभा मतदार संघातील वीज सुविधा व तक्रार निवारण्यासाठी ग्रामसभेत नियोजनाच्या पथदर्शक प्रकल्पाबाबत

**(२) २८७६४ (०८-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा विधानसभा मतदार क्षेत्रात मुलभूत वीज सुविधा व तक्रार निवारण्यासाठी वीज विभागाकडुन (एम.एस.ई.डी.सी.एल.) ग्रामसभेत नियोजनाच्या पथदर्शक प्रकल्प राबविण्यांत आला, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या पथदर्शक प्रकल्पामधुन आलेल्या मागणीनुसार त्या क्षेत्राचा आराखडा तयार झाला असून संबंधीत विभागाने तो शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर आराखडयास मंजूरी दिली आहे काय,

(४) असल्यास, त्यासाठी निधीची तरतुद करण्यांत आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) ग्रामसभेमधून आलेल्या मागणीची तांत्रिक पडताळणी करुन सदर मागणीपैकी काही कामे सद्य:स्थितीत सुरु असलेल्या योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत व उर्वरित मागणी दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना (DDUGJY) व केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजनांमध्ये (IPDS) प्रस्तावित केलेली आहेत.

(३) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेस केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. एकात्मिक ऊर्जा विकास योजनेस केंद्र शासनाने महावितरण कंपनीच्या रु.२३००.४३ कोटीच्या आराखड्यात तत्वतः मंजूरी दिली आहे.

(४) दिनदयाळ उपाध्यक्ष ग्रामज्योती योजनेस (DDUGJY) या योजनेस रु.२१५२.६८ कोटी इतकी मंजूरी मिळण्यात आली असून ६०% अनुदान केंद्र शासन देणार असून १०% खर्च महावितरण कंपनी करणार आहे व ३०% कर्ज घेण्यात येणार आहे. केंद्र शासनाकडून एकात्मिक ऊर्जा विकास योजनेस तत्वतः मंजूरी मिळाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यात रिमोट कंट्रोलद्वारे कारखाने मालक विजेची चोरी करीत असल्याबाबत

**(३) २८९८१ (२३-१२-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात रिमोट कंट्रोलद्वारे कारखाने मालक विजेची चोरी करण्याची किती प्रकरणे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी १ जानेवारी २०१४ ते सप्टेंबर २०१५ अखेरपर्यंत पकडली आहेत,

(२) असल्यास, त्या कालावधीत किती युनिटची वीज चोरी झाल्याचे निदर्शनास आले आहे व त्यांच्यावर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे वा कारवाईची सद्य स्थिती काय आहे,

(३) असल्यास, भविष्यात रिमोट कंट्रोलद्वारे विजेची चोरी रोकण्यासाठी महावितरण कंपनीने कोणती सक्षम यंत्रणा उभारली आहे वा उभारण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) महावितरण कंपनीच्या नांदेड मंडळ परिक्षेत्रात दि.१ जानेवारी, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ या कालावधीत रिमोटकंट्रोल द्वारे वीज चोरी करणारे औद्योगिक ग्राहक आढळलेले नाहीत.
(२) नांदेड मंडळाअंतर्गत रिमोटकंट्रोल द्वारे वीज चोरी करणारे औद्योगिक ग्राहक आढळलेले नाहीत. परंतु रिमोटकंट्रोलद्वारे वीज चोरी करणारे ८ इतर ग्राहक सापडलेले असून त्यांच्या विरुध्द विद्युत कायदा, २००३ नुसार कंपनीने कार्यवाही केलेली आहे.
(३) रिमोट कंट्रोलद्वारे वीजेची चोरी रोखण्यासाठी महावितरणकंपनीतर्फे ग्राहकांसाठी टॅम्पर प्रुफ मिटर बसविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्याना कृषी पंपाचे कनेक्शन प्रलंबित असल्याबाबत**

**(४) २९१६४ (२३-१२-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव (जि.बुलडाणा) येथील शेतकऱ्यांनी मागील दोन वर्षापासून नवीन कृषी पंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत अर्ज व पैसे भरुनसुद्धा अध्याप पर्यंत महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्या. खामगाव यांनी नवीन जोडण्या दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना अद्ध्याप जोडणी न देण्याची करणे काय आहेत,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना कृषी पंपाची जोडणी तत्काळ उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अद्याप याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
खामगांव विभाग अंतर्गत पैशाच भरणा करुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपांना सन २०१२-१३ मध्ये २३१३, २०१३-१४ मध्ये २३५७, २०१४-१५ मध्ये १३६९, व २०१५-१६ मध्ये (जानेवारी, २०१६) अखेरपर्यंत २१६० अशा एकूण ८२२४ कृषीपंपाना महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.
(२) व (३) खामगांव विभागामध्ये माहे मार्च, २०१५ अखेर पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषी पंप वीज ग्राहकांची संख्या २,८४३ एवढी आहे. शेतकऱ्यांना कृषीपंप जोडणी तात्काळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विदर्भ व मराठवाडा विशेष कृषीपंप पॅकेज अंतर्गत एकूण रु.२६.३५ कोटी रक्कमेच्या निविदा काढण्यात आल्या असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच इन्फ्रा-२ योजने अंतर्गत सुध्दा कृषीपंप ऊर्जीकरणची कामे प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहरात अंडरग्राउंड वायरिंग चे काम रखडल्या बाबत**

**(५) २९१९१ (२३-१२-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात ५ वर्षा पूर्वी मुख्य वायरिंग अंडरग्राउंड करण्याचे नियोजन कैंद्रीय उर्जा मंत्रालयातर्फे मिळणाऱ्या वित्तीय कर्ज निधी तुन झाले होते परंतु ते काम अध्याप पूर्ण झाले नसल्याने व निधीचा विनियोग झाला नसल्याने रु.६०० कोटी चा कैंद्रीय निधी परत जाण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या ठिकाणी अंडरग्राउंड वायरिंग झाली आहे अशा ठिकाणच्या लटकणाऱ्या तारा अध्याप काढल्या गेल्या नसल्याने व ज्या ठिकाणी अंडरग्राउंड वायरिंग झाली नाही अशा ठिकाणी शोर्ट सर्किट व डीपी जळणे तसेच वारंवार विज जात असल्याने होणा-या त्रासांना तेथील रहिवाशांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहरात अंडरग्राउंड वायरिंग करण्या संबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.सोलापूर शहरात ५ वर्षापूर्वी सोलापूर शहरातील मुख्य वायरिंग अंडरग्राऊंड करण्यासाठी केंद्रीय ऊर्जा मंत्रालयातर्फे वित्तीय कर्ज निधीतून आर्थिक तरतूद प्राप्त झाली नव्हती. तथापि, सन २०११-१५ या कालावधीत मध्ये केंद्रीय ऊर्जा मंत्रालयामार्फत शहरी भागाकरीता गतीमान विद्युत विकास कार्यक्रम (आर-एपीडीआरपी) ही योजना राबविण्यात आली. सोलापूर शहराकरिता रु.४९.३३ कोटी रकमेची योजना मंजूर करण्यात आली होती. त्याअंतर्गत उपरी लघुदाब वाहिनी अंडरग्राऊंड करण्यासाठी रु.५६.११ लाखाची मूळ तरतूद होती. सदर कामाची निकड लक्षात घेऊन रु.१७४.२४ लाखाची कामे करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही. गतीमान विद्युत विकास कार्यक्रमांतर्गत सोलापूर शहरामध्ये जी ३८.३९ कि.मी उपरी लघुदाब वाहिनी अंडरग्राउंड करण्यात आली आहे. त्यापैकी ३७.१४ कि.मी. उपरी वाहिन्यांच्या तारा काढण्यात आल्या आहेत. अमृतनगर भागांमध्ये सोलापूर महानगर पालिकेने पथदिव्यांसाठी भूमिगत वाहिनी टाकल्यानंतर ज्या ठिकाणची १.२५ कि.मी. उपरी तारा काढण्यात येतील. तसेच ज्या ठिकाणी अंडरग्राउंड वायरिंगचे काम झालेले नाही अशा ठिकाणी शॉर्टसर्किट मुळे रोहित्र जळणे व वारंवार वाहिनीमध्ये बिघाड होणे इत्यादी घटना घडलेल्या नाहीत व तशा प्रकारच्या तक्रारी सोलापूर शहरातील क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे महापालिकेची व तापी योजनेची मागील व चालु विद्युत थकबाकी देयक माफ करण्याबाबत**

**(६) २९३५१ (२३-१२-२०१५). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरात ६० टक्के भागात पाणीपुरवठा करणाऱ्या तापी योजनेची मागील विदयूत थकबाकी व महापालिकेची चालू विद्युत देयक माफ करण्यात यावी अशी मागणी मा.महापौर, धुळे यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयुत देयके माफ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) धुळे मंडळा अंतर्गत उच्चदाब सार्वजनिक पाणी पुरवठ्याचे एकूण ६ ग्राहक आहेत. त्यापैकी २ उच्चदाब ग्राहकांकडे थकबाकी असून सदर दोन्ही ग्राहकांनी यापूर्वीच अभय योजनेत सहभाग घेतलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रशासनाने उजनी धरण ते सोलापूर दरम्यान नदीकाठच्या शेतीचा वीजपुरवठा पूर्ण बंद करण्याचा दिलेल्या आदेशाबाबत**

**(७) २९३६३ (२३-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात पाऊस झाला नसल्याने प्रशासनाने उजनी धरण ते सोलापूर दरम्यान नदीकाठच्या शेतीचा वीजपुरवठा पूर्ण बंद करण्याचा आदेश दिला असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदीकाठची असलेली पीके ऊस, केळी, मका, डाळिंब, द्राक्षे आदी पिकांसह भाजीपाल्यांची पिके जळून खाक झाली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार पीकांचे झालेले नुकसान भरपाई देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. दिनांक २५/०८/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या पाणी टंचाई आढावा बैठकीमध्ये उजनी धरण ते सोलापूर दरम्यानच्या नदीपात्राच्या बंधाऱ्यातील व सर्व ठिकाणच्या पिण्याचे पाण्याचे स्त्रोत केवळ पिण्यासाठी संरक्षित करण्यासाठी त्याठिकाणच्या सर्व कृषी पंपाचा वीज पुरवठा बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनगाव (जि.हिगोंली) या तालुक्यात विद्युत वितरण कंपनीनी घरगुती मीटरमध्ये अफरातफर केल्याबाबत**

**(८) २९५२० (२३-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगाव (जि.हिगोंली) या तालुक्यात विद्युत वितरण कंपनीनी घरगुती मीटरमध्ये अफरातफर करुन ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती मीटरप्रमाणे अफरातफर करण्यात येत असलेले प्रकार त्वरीत थांबविण्याबाबत तसेच मीटरमध्ये अफरातफर करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलेबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) महावितरण मंडळ कार्यालयातर्फे तसेच उपविभाग स्तरावर वीज चोरांवर कारवाई करण्यासाठी विशेष धडक मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार सोनगांव उपविभाग अंतर्गत माहे एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत ८७० ग्राहकांच्या मिटरची तपासणी केलीअसून, त्यामध्ये १३६ ग्राहक वीज चोरी करत असल्याने निदर्शनास आले. त्यापैकी १२ जणांनी दंडापोटी रु.७४,०००/- चा भरणा केला आहे. तसेच १९ ग्राहकांवर महावितरण कंपनीने पोलीस ठाणे जालना येथे गुन्हे दाखल केले आहेत व १०५ वीज चोरांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील कोयना धरणालगत असलेल्या ४० गावाचा वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(९) २९५८० (०८-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोयना धरणालगत आठी, अवसरी, पळासरी, मरड, भिकाडी धुईलवाडी, गावडेवाडी, जोगेटेक, वाटोळे घाणबी, कारवट, जाईचीवाडी, मराठवाडी, रामेळ अशा

सुमारे ४० गावांची वारंवार वीज खंडीत होत असल्याने वीजेअभावी येथील ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडी उपकेंद्राचे काम प्रलंबित असून निधी अभावी उक्त उपकेंद्राचे काम होत नसल्याने याबाबत निधींची तरतूद करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणालगतच्या ४० गावांना ३३/११ के. व्ही. पाटण उपकेंद्रातील पुरवठा केला जातो. सदर मनदुरे गावठाण वाहिनीची लांबी ही सुमो १५० कि.मी. असून ही वाहिनी संपूर्ण डोंगर पठारावरुन जाते. या भगामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार घडत असतात. सदर वाहिनीवर दोष निर्माण झाल्यास तेथील भौगोलिक परिसिथतीमुळे व पावसाचे प्रमाण जास्त असल्याने तसेच वाहिनीची लांबी देखील जादा प्रमाणात असल्याने विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यास विलंब होतो. पावसाळ्या व्यतिरिक्त इतर कालावधीमध्ये विद्युत प्रवाह खंडीत होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.
(२) होय, मराठवडी मौजे जुंगटी, ता.पाटण, जि.सातारा येथील ३३/११ के.व्ही. नवीन उपकेंद्र उभारणीचे काम पायाभूत आराखडा-२ योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्ह्यात कृषी फिडरवर १६ तासांचे भारनियमन होत असल्याबाबत

**(१०) २९७८९ (२३-१२-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात कृषी फिडरवर महिनाभर २४ तास सलग वीज पुरवठा देण्याचे ऊर्जा मंत्री यांनी आश्वासन देऊनही तब्बल १६ तासांचे भारनियमन होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील भारनियमनामुळे उन्हापासून पिकांना वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांची पिके वाचविण्यासाठी शासनाने भारनियमन कमी करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) यवतमाळ जिल्ह्यात कृषी वाहिन्यांवर शासन धोरणानुसार व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनुसार महावितरणच्या दि. १४/०१/२०१३ च्या परिपत्रकान्वये नुसार दिवसाला ८ तास व रात्रीला १० तास ३ फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने केला जातो. एकूण कृषी भारापैकी ५०% भार असलेल्या कृषी

वाहिन्यांना दिवसा ८ तास व उर्वरीत ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांना रात्री १० तास आठव्ड्यातून दोन वेळेस किंवा प्रत्येक आठवड्यास चक्राकार पध्दतीने वीजेची उपलब्धता देण्यात येत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील जवळा बाजार येथे शेतक-यांनी दुप्पट पैसे भरुनही महावितरण कंपनीने शेतक-यांना निकृष्ट दर्जाचे डीपीचा पुरवठा केल्याबाबत**

**(११) ३०२४२ (०८-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील जवळा बाजार येथे शेतक-यांनी दुप्पट पैसे भरुनही महावितरण कंपनीने शेतक-यांना निकृष्ट दर्जाचे डीपीचा पुरवठा करण्यात आल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना निकृष्ट डीपीचा पुरवठा करणा-या महावितरण कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील विजेचे ५१८ खराब झालेले खांब बदलण्याबाबत**

**(१२) ३०४६६ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यात येथे विजेचे ५१८ प्राथमिक खांब खराब झालेले खांब बदलण्यात यावेत तसेच घरगुती वीज बील आकारणी मीटरप्रमाणे करण्याची मागणी उपअभियंता विद्युत विभाग भुदरगड यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) भुदरगड तालुक्यातील खराब झालेले ३५ खांब Upgradation and Modeniation योजनेअंतर्गत बदलण्यात आले आहेत. उर्वरित U and M DPR मध्ये समाविष्ट केलेले आहेत. भुदरगड तालुक्यातील एकूण ३२,३५१ घरगुती वीज ग्राहकांपैकी २९,३१४ ग्राहकांना मीटरच्या रिडींगप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत आहे. उर्वरित ग्राहकांपैकी काही ग्राहकांचे घर बंद असल्यामुळे व काही ग्राहकांचे मीटर नादुरुस्त असल्यामुळे सरासरी देयक आकारण्यात आलेले आहे. नादुरुस्त मीटर उपलब्धतेनुसार बदलण्यात येत आहेत व त्यानंतर ग्राहकांना मीटर रिडिंगप्रमाणे बिल आकारणी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील घारपुरी बंदरावरील गावांना होणारा वीजपुरवठा बंद राहिल्याबाबत**

**(१३) ३०५१४ (२३-१२-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील उरण येथील जागतिक किर्तीच्या घारपुरी बंदरावरील गावाना होणारा वीजपुरवठा गेले आठ दिवस बंद असल्याने संपूर्ण गांव अंधारात असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वीज पुरवठा अचानक बंद होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) घारापुरी बंदरावरील गावांना महावितरणकडून वीज पुरवठा केला जात नसून सध्या तेथे २० के.व्ही.ए. चे ३ डी.जी.सेटद्वारे सायंकाळी ४ ते ५ तासांकरिता ग्रामपंचायतकडून वीजपुरवठा केला जातो.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने घारापुरी बेटाला कायमस्वरुपी विद्युत पुरवठा करण्याची प्रक्रिया चालू केली होती. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी दिनांक १८/८/२०११ रोजी कळविलेल्या पत्रानुसार, सदर प्रक्रिया स्थगित करुन रद्द करण्यात आली. मे, २०१५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार घारापुरी बेटावर विद्युतीकरणासाठी पुनश्च: सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सुधारीत अंदाजपत्राची रक्कम सुमारे रु.१६.६० कोटी आहे. त्यास अनुसरुन एलिफंटा लेणी (घारापूरी बेट) ता.उरण, जि.रायगड येथे विद्युतीकरण करण्यासाठीच्या प्रस्तावाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांच्याकडून निधी उपलब्ध झाल्यास त्वरीत निविदा काढून विद्युतीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महावितरणने औद्योगिक ग्राहकांना नियम डावलून वीज वापराचा गट बदलुन दिला असल्याबाबत**

**(१४) ३०५८६ (२३-१२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणने सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षात १६० औद्योगिक ग्राहकांना नियम डावलून वीज वापराचा गट बदलुन दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगांना ७.२ रुपये युनिट दराची वीज ६.३३ रुपयाला दिली असल्याने उद्योगांना सुमारे प्रति युनिट ६८ पैशांनी स्वस्त विज मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे उद्योगांना सुमारे १८७ कोटी रुपयांचा फायदा झाला असून महावितरणला तेवढाच तोटा झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१), (२) व (३) विद्युत नियामक आयोगाच्या वीज दर निर्णयात १८७ कोटीचा महसुल कमी दिला ही बाब पुर्नविचार याचिकेद्वारे आयोगाकडे सध्या प्रलंबित आहे.

(४) उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी सत्यशोधन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(५) सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई विभागात ऐरोली, घेणसोली, कोपरखैरणे, वाशी, बेलापूर, नेरुळ, इत्यादी भागात विद्युत महावितरण कंपनीचे डी.पी.बॉक्स, ट्रान्सफार्मर इत्यादीची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१५) ३१३०२ (२३-१२-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागात ऐरोली, घेणसोली, कोपरखैरणे, वाशी, बेलापूर, नेरुळ, इत्यादी भागात विद्युत महावितरण कंपनीचे डी.पी.बॉक्स, ट्रान्सफार्मर इत्यादीची दुरावस्था झाली असून कित्येक ठिकाणे विद्युत तारा उघडयावर पडल्या असून, विद्युत उपकरणे निकामी झालेली आहेत याची शासनाने तपासणी केली आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई विभागातील जुनी निकामी झालेल्या विद्युत उपकरणाचा फोटोसहीत संच स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ऊर्जा मंत्री महोदयांना ऑक्टोबर, २०१५ मध्ये सादर करुनही संपूर्ण विद्युत प्रणाली बदलून नवीन विद्युत प्रणाली बसविण्याबाबत निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) महावितण कंपनीकरून तपासणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सन २०१५-१६ या वषर्जत O and M तसेच U and M योंजनेतंर्गत नवी मुंबई शहरात महावितरणच्या वाशी व नेरुळ विभागात देखभाल दुरुस्तीची कामे करयात येत आहेत, तसेच वाशी व नेरुळ विभागाकरीता O and M योजनेतंर्गत DPR मध्ये कामे प्रस्तावित केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील जोर धनगरवाडी अंधारात असल्याबाबत**

**(१६) ३१३१३ (२३-१२-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील माणगांव जवळील रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पळसगाव ग्रामपंचायत हद्दीतील जोर धनगरवाडी येथे ६५ वर्षानंतरही वीज न पोहचल्याने जोर धनगरवाडी अंधारात असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पळसगाव व गांगवली परिसरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवकाळातील अनेक अवशेष, मुर्त्या, घरगुती साहित्य, प्रतिमा, कोरीव हस्तकला आदी साहित्य यांचे जतन व्हावे यासाठी देखील येथील ग्रामस्थ शासनाकडे सातत्याने मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या जोर धनगरवाडीतील ग्रामस्थ आजही अंधारात राहण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जोर धनगरवाडीचा विकास करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१)हे खरे नाही. रायगड जिह्यातील माणगांव तालुक्यात जोर हे गांव असून त्यांचे विद्युतीकरण पूर्वीच झालेले आहे. जोर धनगरवाडी या नावाची वसाहत अस्तित्वात नाही. परंतु माणगांव तालुक्यात जोर गावाशेजारी पळसगांव धनगरवाडी ही वसाहत असूल तिथे विद्युतीकरण झालेले नाही.

(२) अश प्रकारची कोणतीही तक्रार किंवा मागणी महावितरण कंपनीकडे प्राप्त झालेली नाही.

(३) जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग यांच्या दिनांक १०/३/२०१६ च्या पत्रान्वये पळसगांव धनगरवाडीच्या विद्युतीकरणाच्या रु.७.९५ लाखाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. पळसगांव धनगरवाडीच्या विद्युतीकरणाचे काम जिल्हा नियोजन व विकास समिती (DPDC) योजनेंतर्गत निधी प्राप्त झाल्यावर निविदा काढून काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यात वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१७) ३१४०७ (२३-१२-२०१५). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात यंदा पिकांची स्थिती चांगली असताना वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे पिकांना फटका बसत असून, शेत शिवारात पाण्याने भरलेल्या विहीरी असताना अघोषित भारनियमनाने ओलीत करणे अशक्य झाले असल्याने त्यामुळे दोन लाख हेक्टर वरील पीक करपून झाण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील भारनियमन कमी करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही. शासनाच्या धोरणानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेने महावितरण कंपनीच्या दि. १४/०१/२०१३ च्या परिपत्रकानुसार दिवसाला ८ तास व रात्रीला १० तास ३ फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने भारनियमन करण्यात येते एकूण कृषी भारापैकी ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांना दिवसा आठ तास व उर्वरित ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांना रात्री दहा तास आठवड्यातून दोन वेळेस किंवा प्रत्येक आठवड्यास चक्राकार पध्दतीने वीजेची उपलब्धता देण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे-पालघर जिल्ह्यात खाडीलगत मच्छिमारांनी उभारलेल्या मत्स्यप्रकल्पास शेतकऱ्यांप्रमाणे विजेचे दर आकारण्याबाबत**

**(१८) ३१६१० (२३-१२-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-पालघर जिल्ह्यात खाडीलगत शासकीय खाजण जागा भाडेतत्वावर घेऊन स्थानिक मच्छिमारांनी उभारलेल्या मत्स्यप्रकल्पास (कोळंबी उत्पादन) बर्फ कारखाने याना शेतकऱ्यांप्रमाणे विजेचे दर आकारण्याची मागणी येथील मच्छिमारांनी माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात तसेच वारंवार मा.उर्जामंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१)हे खरे आहे.

(२) विद्युत नियामक आयोगने त्यांच्या दिनांक २६/६/२०१५ च्या वीज दर आदेशान्वये मत्स्य व्यवसाय व एकिकृत समुद्र खाद्य प्रक्रिया केंद्र यांच्या वीज वर्गवारीमध्ये बदल करुन वाणिज्यिक ऐवजी औद्योगिक वर्गवारी लागू केलेली आहे. तसेच मत्स्य संवर्धनाचा समावेश, लघुदाब वर्गवारीमध्ये मीटरवर आधारीत कृषी (इतर) या वर्गवारीमध्ये केलेला आहे व उच्चदाबामध्ये उच्चदाब (कृषी) या वर्गवारीमध्ये केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शैक्षणिक संस्था, रुग्णालय, वाजचनालय, पोलीस ठाणे, पोष्ट ऑफीस आदिंना स्वस्त: दराने वीज दर ऑगस्ट, २०१२ पासून लागू करण्याचे निर्देश वीज नियमन विभागाने दिल्याबाबत**

**(१९) ३१८१३ (२३-१२-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक सेवा अंतर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्था, रुग्णालय, वाचनालय, पोलीस ठाणे, पोष्ट ऑफीस आदिंना स्वस्त: दराने सार्वजनिक सेवा वीज दर ऑगस्ट, २०१२ पासून लागू करण्याचे निर्देश वीज नियमन विभागाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सेवा वीज दराबाबत महावितरण कंपनी नाराज असल्याने त्यानी जनजागृती केली ना जाहिरात केली त्यामुळे अनेक सेवा आजही सेवा वीज दराबाबत माहिती नसल्याने ते व्यपारी दराने वीज बिल भरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अशा प्रकारचे निर्देश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि.१६/०८/२०१२ रोजीच्या आदेशान्वये दिले आहेत.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या दिनांक १६/८/२०१२ च्या वीजदर आदेशान्वये "सार्वजनिक सेवा" ही नवीन वर्गवारी तयर केली. आयोगाच्या सदर वीजदर आदेशाच्या अंमलबजावणीबाबत क्षेत्रीय कार्यालयांना दिनांक ५/९/२०१२ च्या परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत व ते महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच ग्राहकांना लागू होणारे वीजदरांबाबतची माहिती त्यांना दरमहा देण्यात येणाऱ्या वीज बिलाच्या पाठीमागे छापलेली असते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर शहरात खंडीत होणारा वीज पुरवठ्याचे प्रमाण कमी करणेबाबत**

**(२०) ३१८४२ (२३-१२-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर शहरात दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ पासून सातत्याने १८ तास वीज पुरवठा खंडीत करण्यात येत असल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शहापूर शहरात होणाऱ्या वीज पुरवठा खंडितचे प्रमाण कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. परंतु सदर कालावधीत वीज वाहिनी नादुरुस्त झाल्यामुळै वीज पुरवठा खंडीत झाला होता.
(२) व (३) शहापूर शहराला वीज पुरवठा करणाऱ्या उच्च दाब वीज वाहिनीच्या तारा जुन्या झालेल्या असल्याने व त्यांच्यावर जास्त विद्युत भार असल्यामुळे त्या कमकुवत झाल्या होत्या. त्यामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढलेले होते. ते प्रमाण कमी करण्यासाठी अधिक वीज वहन क्षमतेच्या नवीन वीज वाहक तारा बसविण्यंकरिता दिनांक ९.१०.२०१५ रोजी एकूण ८ तास, दिनांक १०.१०.२०१५ रोजी त्याच वीज वाहिनीच्या आयसोलेटर दुरुस्तीसाठी पुन्हा १ तास विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होता. दिनांक १३.१०.२०१५ रोजी तुटलेल्या

उच्च दाब वाहिनीच्या दुरुस्तीकरिता १ तास ४० मिनिटे वीज पुरवठा बंद करण्यात आला होता. विद्युत पुरवठा बंद कालावधीमध्ये एकूण २ कि.मी. अंतरामधील विद्युत वाहिनीच्या तीनही फेजच्या वीज वाहक तारा बदलण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धाड परिसरात (जि.बुलढाणा) कृषि विकासाला गती देण्याबाबत**

**(२१) ३१९८४ (२३-१२-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाड परिसरात (जि.बुलढाणा) कृषि विकासाला गती देण्याकरिता १३२ केव्हीचे उपकेंद्र बसविण्यात आले आहे, परंतु या उपकेंद्रावर अतिरिक्त दाब झाल्यामुळे येथील यंदाचा रब्बी हंगाम प्रभावित होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजेची वाढती मागणी व पुरवठा याचा विचार करता या उपकेंद्रामध्ये २५/२५ चे दोन किंवा ५० एमव्हीएचा ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी तेथील शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्याकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील वीज ग्राहकांना वाढीव बीजे देयके पाठविण्यात आल्याबाबत**

**(२२) ३२४१७ (०८-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐरोली (नवी मुंबई) परिसरातील नागरिकांना सप्टेंबर, २०१५ महिन्यांची विद्युत देयके भरमसाठ आल्याने तेथील सर्वसामान्य नागरिकांनी लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली माहे ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी महावितरणांच्या कार्यालयावर कंदील मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन अभियंता यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार वारंवार वाढीव वीज बिले पाठवून नाकरीकांना वेठीस धरणाऱ्या महावितरण कंपनीच्या कार्यालयावर यापूर्वीही अनेकवेळा मोर्चे काढण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाढीव देयके पाठवून सर्वसामान्य नागरिकाना लुबाडणाऱ्या महावितरणावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीतर्फे चौकशी करण्यात आली आहे.
(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या दिनांक २६.६.२०१५ च्या आदेशान्वये दिनांक १.६.२०१५ पासून सुधारित वीज दर लागू केलेले असून त्यानुसार ग्राहकांना वीज बिले देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे वीज भरणा केंद्र सुरु करण्याची केलेली मागणी**

**(२३) ३२५७९ (०८-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे वीज भरणा केंद्र सुरु करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, उर्जामंत्री व सचिव, विद्युत विभाग यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व तेथील नागरीकांनी माहे जुलै, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोवाड येथे वीज भरणा केंद्र उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.
(३) कोवाडा येथे नवीन वीज बिल भरणा केद्र सुरु करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलडाणा) परिसरातील म.रा.वि.वि. कं. मर्या. मधील**
**INFRA - २ या योजनेची कामे सुरु करणेबाबत**

**(२४) ३३२७६ (११-०१-२०१६). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव मतदार संघात INFRA - २ या योजनेत म.रा.वि.वि.कं. मर्या. या योजने अंतर्गत बरीचशी कामे मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची कामे अशोका बिल्डकॉन या कंपनीला मिळाले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास,नवीन कृषी पंप जोडण्याकरिता तसेच इतर शेतकऱ्यांच्या जोडण्या प्रलंबित कामे अद्यापपर्यंत करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे अशोका बिल्डकॉन कंपनीने अद्याप पर्यंत निविदेच्या नियम व अटीनुसार माईल स्टोन प्रमाणे कामे सुरु केलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मंजूर झालेली कामे सुरु न केल्याबाबत दोषी असलेल्या अशोका बिल्डकॉन कंपनीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पायाभूत आराखडा-२ अंतर्गत खामगांव तालुक्यात मार्च, २०१३ पूर्वी रक्कम भरुन प्रलंबित असलेल्या २९६ कृषीपंप धारकांची यादी मे. अशोका बिल्डकॉन या कंत्राटदार कंपनीस देण्यात आलेली आहेत. त्यापैकी १५६ कृषीपंप धारकांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(४) हे खरे नाही.

मे.अशोका बिल्डकॉन कंपनीचे काम माईलस्टोनप्रमाणे करीत असून कामाची प्रगती समाधानकारक आहे.

(५), (६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर तालुक्यातील सायखिंडी उपकेंद्रातर्गत येणा-या गावांमध्ये वीजपुरवठा वांरवार खंडीत होत असल्याबाबत

**(२५) ३३४०३ (२३-१२-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर तालुक्यातील सायखिंडी उपकेंद्रातर्गत येणा-या गावांमध्ये वीजपुरवठा वांरवार खंडीत होत असल्यामुळे शेतकऱ्यांना मोठया समस्येला सामोरे जावे लागत असल्याची बाब ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनस आले आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. आगस्ट, २०१५ च्या दरम्यान १३२ केव्हा संगमनेर वीज उपकेंद्रातून निघणारी ११ केव्ही सायखिंडी कृषी विद्युत वाहिनी नादुरुस्त झाल्यामुळे सदर वाहिनीवर दुरुस्तीचे काम करण्यासाइ‍ तात्पुरत्या स्वरुपात विद्युत पुरवठा बंद करण्यात आला हाता.
(२) वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी संबंधित विद्युत वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीचे काम महावितरण कंपनीकडून करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य वीज नियामक आयोगाने केलेल्या वीज दरवाढीचा फटका घरगुती ग्राहकांना बसत असल्याबाबत**

**(२६) ३३४१४ (०८-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य वीज नियामक आयोगाने केलेल्या वीज दरवाढीचा फटका घरगुती ग्राहकांना बसत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजेची अतिरिक्त दरवाढ रोखण्यासाठी व ग्राहकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रन उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहा तालुक्यातील (जि.नांदेड) येथे नवीन वस्ती, वाडी-तांड्यावर दिवाबत्तीची सोय होण्याबाबत**

**(२७) ३३९६९ (२३-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा तालुक्यातील (जि.नांदेड) येथे नवीन वस्ती, वाडी-तांड्यावर दिवाबत्तीची सोय व्हावी यासाठी शासनाच्या सुचनेनुसार महावितरण मार्फत दिवाबत्ती (स्ट्रीट लाईट) ही योजना राबविण्यात येत आहे मात्र केवळ पोलअभावी तालुक्यातील ५४ गावांत ही योजना पूर्ण होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दिवाबत्ती योजनेसाठी पोल उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा लोडशेडींग पासून मुक्त करण्याची केलेली मागणी

**(२८) ३४६३७ (०८-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा लोडशेडींग पासून मुक्त करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापपर्यंत नागपूर जिल्हा लोडशेडींग मुक्त करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर जिल्हा लाडशेडींग मुक्त करण्याबाबत शासनाने काही कृती आराखडा तयार केला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.
नागपूर जिल्हा लोडशेडिंग पासून मुक्त करण्याकरीता कृती आराखडा तयार केलेला आहे. नागपूर जिल्ह्यात एकूण १६३ अकृषण वाहिन्या असून त्यापैकी कामठी शहरास वीज पुरवठा करणाऱ्या २ वाहिन्या “ई” ग्रुप व एक वाहिनी “एफ” ग्रुप मध्ये आहे. सदरील वाहिन्यांवरील वितरण व वाणिज्य हानी कमी करण्यासाठी वर्ष २०१५-१६ मध्ये (डिसेंबर पर्यंत) ४५५ वीज चोऱ्या पकडण्यात आल्या आहेत, त्यपैकी ९४ ग्राहकांवर विद्युत कायदा, २००३ कलम १३५ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच रु. १२.२८ लक्ष वसूली करण्यात आली आहे. कामठी शहरात वीज चोरी जास्त असलेल्या भागात १२ कि.मी. एरीयल बंच केबल (A.B.Cable) टाकून वीज चोरीला आळा घालण्यात आला आहे. कामठी येथे रु. २.८५ कोटीची देखभाल व दुरुस्तीची कामे इन्फ्रा योजनेअंतर्गत प्रस्तावित आहेत. तसेच कामठी शहरातील वाहिन्यांचा वितरण व वाणिज्य हानी कमी करण्यासाठी वाहिनी व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजूरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) विरूर (स्टे.) व परिसरात माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवडयापासून वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याबात

**(२९) ३५०६५ (०८-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) विरूर (स्टे.) व परिसरात माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवडयापासून वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडीत होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, वारंवार खंडीत होणारा वीज पुरवठा सुरळीत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शेतक-यांनी पैसे भरुन वीज कनेक्शन दिली गेली नसल्याबाबत**

**(३०) ३५२८२ (१३-०१-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज विभागातील १४४२ ग्रामीण-१ (पुलेवाडी ते गगनबावडा, पन्हाळा) ३१४०, इचलकरंजी शहर विभाग ३६०, जयसिंगपूर विभाग ९११, ग्रामीण-२ (कागल, राधानगरी, भुदरगड) २१८९ इत्यादि शेतक-यांना पैसे भरुनही कनेक्शन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील शेतक-यांना वीज कनेक्शन न मिळाल्यामुळे नदी व विहिरीमध्ये पाणी उपलब्ध असूनही काढता येत नाही त्यामुळे पिके जळून जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वीज कनेक्शन देण्यास विलंब लावणा-या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे. डिसेंबर, २०१५ अखेर कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज विभागातील १६७७, ग्रामीण विभाग १-३२१६, इचलकरंजी विभाग १११, जयसिंगपूर विभाग ७४१, ग्रामीण विभाग २-२३८८ व कोल्हापूर शहर विभाग-६ एवढे शेती पंपासाठी अर्ज पैसे भरुन प्रलंबित आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) महावितरण कंपनीच्या इन्फ्रा-२ या योजनेतून पैसे भरलेल्या प्रलंबित शेतीपंप ग्राहकांसाठी जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देण्यात येत आहे.
(४) इन्फ्रा-२ योजनेचे काम समाधानकारक व गतीशील नसल्याने मे. प्रतिभा आणि प्रतिक असोशिएट्स यांचे कंत्राट रद्द करण्यात आले असून त्या कंत्राटदाराचे उर्वरीत काम करण्यासाठी फेर निविदा काढून नवीन ठेकेदारांना कामे देण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाकर-श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात वारंवार विज खंडित होत असल्याबाबत**

**(३१) ३५६६० (१३-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाकर-श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात पूर्व भागात वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याने येथील नागरीक त्रस्त झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या खंडीत पुरवठ्यामुळे सबस्टेशनच्या कार्यक्षेत्रातील १४ गावातील संतप्त ग्राहकांनी व शेतकऱ्यांनी भोकर येथील विभागीय कार्यालयास टाळे लावले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वारंवार विज खंडित न होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(४) ३३ के.व्ही. भोकर वाहिनीचा वीज पुरवठा वारंवार खंडित होऊ नये म्हणून महावितरण कंपनीमार्फत संबंधित वाहिनीलगतच्या झाडांच्या फांद्या कापण्यात आलेल्या आहेत, सैल तारा ओढण्यात आलेल्या आहेत, वाकलेले खांब सरळ करण्यात आले आहेत, तसेच रिजंपरिंग करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरणाच्या थकबाकीचे असून वीज खरेदीसह महावितरणाची इतर देणी फेडण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडून ५ हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागल्याबाबत**

**(३२) ३६२०७ (२३-१२-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणाच्या थकबाकीचे प्रमाण २१ हजार ९०० कोटी असून वीज खरेदीसह महावितरण कंपनीची इतर देणी फेडण्यासाठी सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास स्टेट बँक ऑफ इंडियाकडून ५ हजार कोटी रुपयांचे कर्ज घ्यावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, सदर कर्ज काढण्यास शासनाची अनुमती घेण्यात आली होती काय, असल्यास केव्हा,

(४) असल्यास, सदर कर्जास शासनाने हमी दिली आहे काय, सदरचे कर्ज महावितरण कंपनी कोणत्या माध्यमातून फेडणार आहे,
(५) असल्यास महावितरण कंपनी बंद करण्याच्या बाबीवर शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर कर्ज घेण्यासाठी महावितरण कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीची अनुमती घेतलेली आहे.
(४) सदर कर्जास शासनाने हमी दिलेली नसल्याने त्याची परतफेड महावितरण कंपनी आपल्या अंतर्गत महसुलीमधून करणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामठी, नागपूर जिल्हातंर्गत विज दाब वाढल्याने शेकडो विद्युत उपकरणे निकामी झाल्याबाबत**

**(३३) ३६२४० (२३-१२-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामठी, नागपूर जिल्हातंर्गत दिनांक १६ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर, २०१५ ला विज रोहित्री देखभाल दुरुस्ती अभावी विज दाब वाढल्याने विद्युत उपकरणे निकामी झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण चे अधिकारी व कर्मचारी यांच्या अक्षम्य कार्यकक्षेमुळे अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरण ने जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई करणार आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरातील रस्त्याच्या मधोमध असलेल्या खांबांमुळे निष्पाप व्यक्तीना जीव गमवावा लागत असल्याबाबत**

**(३४) ३६३३२ (२३-१२-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रस्त्याच्या मधोमध असलेलया खांबांमुळे निष्पाप व्यक्तींना आपला जीव गमावावा लागत असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या मधोमध असलेल्या विद्युत खांब व ट्रान्सफार्मरमुळे रस्त्यांवरुन वाहने चालवितांना व आवागमण करतांना फार त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब व ट्रान्सफार्मर हटविण्यात विलंब करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
नागपूर शहरातील रस्त्यांच्यामधोमध खांब आहे. परंतु सदरील खांबांमुळे निष्पाप व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला अश्या प्रकारची कोणतीही माहिति प्राप्त नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) नागपूर शहरातील रस्त्याच्या मधोमध असलेले विद्युत खांब व ट्रान्सफॉर्मर हटविण्याची कामे नागपूर महापालिकेकडून नियुक्त कंत्राटदारांमार्फत हाती घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरेड तालुक्यातील नांद शिवारातील गुराख्यास वीजवितरण विभागाकडून दोन महिन्याचे अवाजवी वीज देयक पाठविल्याबाबत**

**(३५) ३६३६५ (०८-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड तालुक्यातील नांद शिवारातील गुराख्यास वीजवितरण विभागाकडून दोन महिन्याचे रु.३९,७२०/- इतक्या रकमेचे वीज वापर देयके पाठविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज वितरण विभागाकडून वीज वापराचा नोंदी न घेता अवाढव्य वीज वापर देयके पाठविण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजित वीज देयके पाठविल्याने अनेक ग्राहकांची वीज वितरण अधिकाऱ्यांकडून अनाधिकृतरित्या वसुली होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) संबंधित ग्राहकांचे एप्रिल, २०१४ जे जून, २०१५ या कालावधीत मिटर वाचन न झाल्याने त्याचे मिटर वाचन करुन १५ महिन्यात वाचन विभागून रु.१८,४१०/- इतक्या रक्कमेचे वीज देयक जुलै, २०१५ मध्ये देण्यात आले होते.

(२) व (३) हे खरे नाही.
(४) या प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली असून संबंधित कंत्राटदाराविरुध्द दंडात्मक कारवाई केली आहे.

---

**केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे अनेक दिवसांपासून काही भागातील विज पुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत**

**(३६) ३६९०८ (२३-१२-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे अनेक दिवसांपासून काही भागातील विज पुरवठा खंडीत करण्यात आला असून त्याकडे विज कंपनीच्या अधिकारी व कर्मचा-यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी अनेक दिवस लाईट गेली असून डिपी जळाल्याचे कारणे कारणे सांगून दिशाभूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर विज कंपनीच्या दुर्लक्ष करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीव्दारे उभारण्यात येणाऱ्या नविन उपकेंद्राबाबत**

**(३७) ३७११६ (२३-१२-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीव्दारे राज्यातील १४ परीमंडळास नविन विज उपकेंद्र उभारण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात परिमंडळात एकूण किती नविन विज उपकेंद्र उभारण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सर्वात जास्त नविन विज उपकेंद्र कोणत्या परिमंडळात उभारले जाणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना व एकात्मिक उर्जा विकास योजना या दोन केंद्र पुरस्कृत योजनेमधून नवीन वीज उपकेंद्र उभारण्यात येणार आहेत.

(२) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेस ऑग्स्ट २०१५ मध्ये तत्वत: मंजूरी प्राप्त झाली असून विदर्भातील ५ परिमंडळात एकूण ७८ वीज उपकेंद्र व एकात्मिक उर्जा विकास योजना ऑगस्ट, २०१५ मध्ये तत्वत: मंजूरी प्राप्त झाली असून विदर्भातील ५ परिमंडळात एकूण ३८ वीज उपकेंद्र उभारण्यात आलीआहेत.

(३) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेत सर्वात जास्त नवीन उपकेंद्रे औरंगाबाद परिमंडळात एकूण ३६ उपकेंद्रे व एकात्मिक उर्जा विकास योजनेत सर्वाज जासत नवीन उपकेंद्रे नाशिक परिमंडळात एकूण १७ उपकेंद्रे उभारली जाणार आहेत.

---

### जव्हार-मोखाडा (जि.पालघर) या दोन्ही तालुक्यात भारनियमन रद्द करण्याबाबत

**(३८) ३७१२३ (२३-१२-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-मोखाडा या दोन्ही तालुकयात (जि.पालघर) महावितरणाने माहे ऑक्टोबर, २०१५ पासूनच दुपारी १२ ते ३ या काळात सुरु केलेले भारनियमन रद्द करण्याची मागणी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शिवसेनेच्या तालुकाप्रमुखांनी महावितरणाच्या अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार महावितरणाने भारनियमन रद्द करण्याबात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती शहरात एकात्मीक ऊर्जा विकास योजने अंतर्गत भुमिगत विद्युत वाहिनी टाकण्याच्या प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्याबाबत

**(३९) ३७१९७ (०८-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात एकात्मीक ऊर्जा विकास योजने अंतर्गत भुमिगत विद्युत वाहिनी टाकण्याच्या प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी लोकप्रतिनीधी अमरावती यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची कामे केव्हा सुरु करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) अमरावती शहराकरीता केंद्र पुरस्कृत एकात्मिक उर्जा विकास योजनेअंतर्गत रु. १२४.३७ कोटीच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मंजूरी दिली आहे.

(३) कामे सुरु करण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेडगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) या गावातील गारपीट व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आलेल्या अवाजवी वीज बिलाबाबत**

**(४०) ३७७७१ (०८-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेडगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) या गावात अनेक शेतकऱ्यांचा नावांचा गारपीट व दुष्काळग्रस्त यादीत समावेश असून दुष्काळग्रस्तांना दोन वीज बिलात ३३ टक्के सवलत देण्याची घोषणा करुनही शेतकऱ्यांना आलेल्या चार बिलांची रक्कम वीज बिलात दिलेल्या सुट इतकी बरोबरीत किंव्हा अधिक कमी असल्याने माहे ऑगष्ट, २०१४ नंतर आलेली बिले भरण्यासंदर्भात शेतकरी संभ्रमात पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बिलामध्ये व्याज व दंड कशा प्रकारे आकारण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी आहे काय चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगाव तालुक्यातील (जि.जळगाव) वलवाडी येथील ईलेट्रिक पोल बदलण्याबाबत**

**(४१) ३७८३७ (१३-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव तालुक्यातील (जि.जळगाव) वलवाडी येथील ईलेट्रिक पोल जूने व जीर्ण झाल्याबाबत व अन्य समस्यांबाबत विजवितरण कंपनीस सातत्याने निवेदन देऊनही कार्यवाही करीत नसल्याने तेथील ग्रामस्थानी वीजवितरण कंपनीच्या कार्यालयासमोर माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास आमरण उपोषणास बसले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या गावातील विजेच्या समस्या तातडीने सोडविण्यासंदर्भात व जीर्ण झालेले वीजेचे इलेक्ट्रीक पोल बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

दि. ०५.१०.२०१५ रोजी सरपंच वलवाडी यांनी उपकार्यकारी अभियंता भडगांव यांना तसेच निवेदन दिले होते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सरपंच ग्रामपंचायत वलवाडी यांनी नादुरुस्त स्ट्रीट लाईट दुरुस्त करणे, वायरमनची नेमणूक करणे व सिंगल फेज रोहित्र बदलणेबाबत दि. ०५.१०.२०१५ रोजी उपकार्यकारी अभियंता भडगांव, यांनी कार्यालयात जाऊन समक्ष भेट घेतली होती. त्यानुसार पाचोरा विभागासाठी यु ॲन्ड एम योजनेत वलवाडी गावातील जीर्ण झालेले १० खांब तसेच वाकलेले स्ट्रीट लाईटचे खांब सरळ करणे/ बदलण्याचे कामाचा समावेश केला असून दि. ०६.०१.२०१६ रोजी मे.डि.के. इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस यांना कार्यादेश देण्यात आले आहेत. वलवाडी येथील नादुरुस्त झालेले दोन सिंगल फेज वितरण रोहित्र दि. १८.१०.२०१५ रोजी बदल्यात आले आहेत तसेच वलवाडी येथील क.तंत्रज्ञ सेवानिवृत्त झाल्याने शेजारील गावातील कर्मचाऱ्यांकडे या गावाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून सद्य:स्थितीत बाहयस्त्रोत कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचोरा (जि.जळगाव) येथे LT लाईन काढून एरियल बंच केबल लावन्याबाबत

**(४२) ३७८९० (०८-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि.जळगाव) येथील डिव्हिजन मधील ११ के.व्ही. चे २७ फिडर पैकी ४ च फिडर हे ABCD ग्रुप मध्ये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २७ फिडर वर LT लाईन असल्याने या ठिकाणी LT लाईन काढून एरियल बंच केबल लावल्यास वीज चोरी, वीज भारनियमन कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, AB केबल चा वापर २७ फिडरवर करण्या करीता शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, या करीता निधीची तरतुद केली आहे काय, व हे काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) पाचोरा (जि.जळगांव) विभागात शहर व गावठाणचे एकूण २७ फिडर आहेत. वितरण व वाणिज्य हानीच्या A,B,C,D,E,F,G१,G२,G३ या वर्गवारीनुसार माहे मे, २०१५ मध्ये २७ पैकी ४ फिडर A,B,C,D या गटात होते. सद्य:स्थितीत सप्टेंबर, २०१५ च्या हानीनुसार ६ फिडर A,B,C,D हानीनुसार ६ फिडर A,B,C,CD या गटात आहेत. उर्वरित २१ फिडरपैकी E व F या गटात प्रत्येकी १ व G१,G२,G३ गटांमध्ये १९ फिडर आहे.

(२) होय.
(३) व (४) पाचोरा विभागातील वरील २७ फिडरवर ३२.८२ कि.मी. एरीयल बंच केबदलची आवश्यकता असून सन २०१५-१६ करिता ओ.ॲड एम अंतर्गत एकूण ३० कि.मी. व दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजने अंतर्गत २.८२ कि.मी. एरीयल बंच केबल प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या भारनियमात बदल करण्याबाबत**

**(४३) ३७९४० (०८-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या भारनियमनामुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याने संध्याकाळचे ७ ते १० या कालावधीतील भारनियमन बदलून सकाळी ११ ते ६ या वेळेत करण्याबाबत माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांकडून शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६)** :(१) हे खरे आहे. याबाबत सरपंच, ग्रामपंचायत दाळिंब ता.उमरगा यांच्याकडून दि. १४.१०.२०१५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) सध्या राजयात जेवढी वीजेची मागणी आहे तेवढी वीज उपलब्धता आहे. त्यामळे वीजेच्या मागणी एवढा वीज पुरवठा केला जातो. काही तांत्रिक कारणास्तवर आणीबाणीच्या परिस्थितीत गरज पडल्यास वीज प्रणाली सुरक्षितेसाटी टप्प्याटप्प्याने तात्पुऱ्या कालावधीसाठी अथवा वितरण व वाणिज्य हानी जास्त असलेल्या वाहिन्यांवर आवश्यकतेनुसार भारनियम करण्यात येते. मौजे दाळिंब गावाला ३३/११ के.व्ही. उपकेंद्रातून ११ के.व्ही. दाळिंब गावठाण वाहिनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. सदर वाहिनी वितरण व वाणिज्य हानीवर आधारित गटानुसार जी-2 गटात येते या वाहिनीवरील वितरण व वाणिज्य हानी कमी करण्याकरिता उपविभागीय पातळीवर वीज चोरी शोध मोहिम हाती घेतली असून थकित बिलाची वसुली प्रगतीपथावर आहे. वितरण व वाणिज्य हानीवर आधारीत गट सुधारण्याकरिता प्रयत्न करुन सदर वाहिनीचा वितरण व वाणिज्य गट अ ते ड गटादरम्यान आणून भारनियम कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुसद महागाव उमरखेड (जि.यवतमाळ) येथे वेळोवेळी विजपुरवठा खंडीत होत असून कमी दाबाने विज पुरवठा होत असल्याबाबत**

**(४४) ३७९५७ (०८-०१-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद महागांव उमरखेड (जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांना उद्योग व लघुउद्योग रुग्णालयांना व्यापारी प्रतिष्ठानां वेळोवेळी खंडीत विजपुरवठा होत असून कमी दाबाने विज पुरवठा होत असल्याने रोहीत्र जळत असून एक-एक महीना रोहीत्र बदलून मिळत नसल्याने, शेतकरी अपुऱ्या व खंडीत विजपुरवठ्याने मोहारी चालत नसल्याने, रुग्णालयात शस्त्रक्रीयेच्यावेळी विजपुरवठा खंडीत होत असल्याने, जनतेमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचणाची सोय, विजपुरवठा इत्यादी सर्व उपलब्ध असूनही खंडीत व कमी दाबाच्या विज पुरवठ्यामुळे आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्हयात सिंचणाची सोय व्हावी म्हणून खासबाब म्हणून शासन कार्यवाही करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरेआहे.

पुसद, महागाव, उमरखेड जि.यवतमाळ येथील उद्योग, लघुउद्योग, रुग्णालये व व्यापारी प्रतिष्ठांना योग्य दाबाचा वीज पुरवठा होत आहे परंतु कृषी पंपाकरीता करण्यात येणारा वीज पुरवठा काही ठिकाणी रोहित्रे नादुरुस्त झाल्यामुळे खंडित झाला होता.

(२) यवतमाळ जिल्हयात सिंचनाची सोय व्हावी म्हणून कृषीपंप विशेष अनुदानाअंतर्गत रु. ५७ कोटीचा निधी सन २०१५-१६ या वर्षात प्राप्त झाला असून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच यवतमाळ जिल्हयातील खंडीत व कमी दाबाच्या वीज पुरवठ्याचा प्रश्न निकाली काढणेकरिता योजना प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे दुर्गवाडा, धारवाडा, बोर्डा, हसनापूर (ता.तिवसा) येथील अतिरिक्त भारनियमामुळे होत असलेल्या पिकांच्या नुकसानीबाबत**

**(४५) ३८१६१ (११-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दुर्गवाडा, धारवाडा, बोर्डा, हसनापूर (ता.तिवसा) येथील अतिरिक्त भारनियमामुळे व इत्तर कारणामुळे होत असलेल्या पिकांच्या नुकसानीबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी गावातील अतिरिक्त भार कमी करण्याबाबत व शेतीस नियमित खरीप हंगामात विज पुरवठा करण्याबाबत कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्या, (ग्रामीण) अमरावती व जिल्हाधिकारी, अमरावती यांना माहे २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यादरम्याप निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने मौजे दुर्गवाडा, धारवाडा, बोर्डा, हसनापूर ता.तिवसा येथील अतिरिक्त भार कमी करण्याबाबत व शेतीस नियमित खरीप हंगामात विज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) मौजे दुर्गवाडा, धारवाडा, बोर्डा, हसनापूर (तातिवसा) या गावांचा वीज पुरवठा हा ३३ के.व्ही. अंजनसिंगी उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. अंजनसिंगी वाहिनीवरुन केला जातो. सदर वाहिनीवरील भार क्षमतेपेक्षा जास्त होत असल्याकारणाने अंजनसिंगी वाहिनीचा काही भार ११ के.व्ही. दुर्गवाडा वाहिनीवर विभाजीत करण्यात आलेला आहे. तसेच अंजनसिंगी वाहिनीचे विभाजन आणि ३३ के.व्ही. अंजनसिंगी उपकेंद्राचा भार कमी करण्याकरीता ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्याती योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वीजेची मागणी वाढली असून १६५०० मेगावॅटपर्यंत पोहचल्याचे निष्पन्न झाल्याबाबत**

**(४६) ३८१९१ (०८-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पाऊस न पडल्याने महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट पसरले, असल्याने त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना केल्या जात असतानाच पाऊस लांबल्याने माहे ऑक्टोबर, हीट वाढू लागल्याने राज्यात वीजेची मागणी वाढली असून ती माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास १६५०० मेगावॅटपर्यंत पोहचल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे सप्टेंबर पासून उन्हाचे चटके बसू लागल्याने, घरांघरांत पखे, वातानुकूलन यंत्र, कूलर यांचा वापर मोठया प्रमाणात वाढल्याने वीजेची मागणीत मोठया प्रमाणावर वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात राज्यात वीजेची तूट भरुन काढण्यासाठी शासनामावर्फत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे अंशतः खरे आहे.
राज्यात वीजेची मागणी माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास १६४६१ मे. वॅ. पर्यंत पोहोचली होती.
(२) हे खरे आहे.

(३) राज्यतील सध्याच्या व भविष्यातील गरजा लक्षात घेऊन महावितरण कंपनीने महानिर्मिती व केंद्रीय स्त्रोतांकडून सामंजस्य कराराव्दारे तसेच खाजगी स्त्रोतांकडून ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार पारदर्शक निविदेव्दारे दिर्घकालीन वीज खरेदी करार केले असून वीजेच्या उपलब्धतेत वाढ करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखला आहे. सध्या राज्यात वीजेचा कुठलाही तुटवडा नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वरुड (ता.जि.जालना) येथील गट नं.१४९ मध्ये वीज वितरण कंपनीमार्फत नविन ट्रान्सफार्मर व लाईन करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४७) ३८७०५ (११-०१-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वरुड (ता.जि.जालना) येथील गट नं.१४९ मध्ये वीज वितरण कंपनीमार्फत सन २०१५ मध्ये नविन ट्रान्सफार्मर व लाईन करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असून या निकृष्ट कामांची चौकशी करुन पूर्ववत डी.पी. व ट्रान्सफार्मर दुरुस्त करुन वीज चालू करण्याबाबत मा.कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या. मस्तगड, जालना यांना दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास तेथील ग्रामस्थांनी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने डी.पी. व ट्रान्सफर्मर दुरुस्त करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीच्या औरंगाबाद परिमंडळातील जालना-१ विभागातील सहाय्यक अभियंता (पायाभूत आराखडा) यांनी सदर ठिकाणची स्थळ पाहणी केली असता डेंजर बोर्ड व काटेरी तार लावण्यंत आलेले नव्ती, दोन पोलचे स्ट्रक्चर अंशत: वाकलेले होते, उच्च दाब वाहिनीच्या सहा गाळ्यांमधील तारा ढिल्या होत्या, एका पोलचे मफींग व पेंटीग करण्यात आलेले नव्हते, उच्चदाब वाहिनीच्या एका खांबाला ताण वायर लावलेला नव्हता इ. त्रुटी आढळून आल्या होत्या.
(३) चौकशीमध्ये आढळलेल्या सर्व त्रुटींची पुर्तता संबंधित ठेकेदाराकडून महावितरणच्या नियमाप्रमाणे करुन घेण्यात आली व त्यानंतर सदर रोहित्राचा वीज पुरवठा दि.२४.०१.२०१६ रोजी सुरु करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील धामक परिसरात बरेच विद्युत खांब पुर्णत: वाकले असल्याने वीज पुरवठा खंडित होत असल्याबाबत**

**(४८) ३८८१४ (११-०१-२०१६). श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धामक परिसरात बरेच विद्युत खांब पुर्णत: वाकले असून अनेक ठिकाणी विद्युत तारा लोबंळत असल्याने येथील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने येथील नागरीकांनी आंदोलन पुकारण्यात येईल असा इशारा दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील विद्युत खांब व लोबंकळणाऱ्या विद्युत तारा यांची दुरुस्ती करुन येथील वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) धामक परिसरातील विद्युत खांब व लोंबकळणाऱ्या विद्युत तारा यांची दुरुस्ती करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील पथ्रोट केंद्र अंतर्गत साडेतीन हजार वीज ग्राहकाना वीजेची बिले उशीरा देवून दंड वसूल करीत असल्याबाबत**

**(४९) ३८८३५ (०८-०१-२०१६). श्री.रणजीत कांबळे (देवळी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पथ्रोट केंद्र अंतर्गत साडेतीन हजार वीज ग्राहक संख्या असलेल्याना दरमहा वीज बिलाची देयके देतांना कंत्राटदाराची माणसे चुका करुन तारीख गेल्यावर देयके देतात त्यामुळे ग्राहकांना १० रुपयांचा नाहक दंड भरावा लागत असल्याने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील वीज ग्राहकांना निर्धारित वेळेत वीज देयके देण्याबाबत व बिला मध्ये चुका करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

पथ्रोट वितरण केंद्राअंतर्गत ३,५०० ग्राहकांपैकी १,००० ग्राहाकांची बिले वीज बिल भरण्याच्या तारखेनंतर वाटप केल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

(२) वीज ग्राहकांना निर्धारित वेळेत वीज देयके वितरीत न करणे तसेच वीज बिलामध्ये चुका करणाऱ्या मे. वर्कग्रुप सुशिक्षित बेरोजगार सेवा सहाकरी संस्था मर्यादित, अमरावती या कंत्राटदारास रु. १०,०००/- चा दंड आकारण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतक-यांना विजेचे कृषीपंप मोफत मिळणेबाबत

**(५०) ३९३३५ (११-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना कमी विजेवर चालणारी व मुदत संपलेल्या कृषी पंपाना जादा विज लागत असल्याने विजेचा तुटवडा लक्षात घेता शेतकऱ्यांना १ लाख नवे मोफत कृषी पंप पहिल्या टप्यात बदलणार असल्याची घोषना माहे ७ नोव्हेंबर २०१५ च्या दरम्यान मा.उर्जा मंत्री यांनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कृषी पंप बदलून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) शेतीपंपाचा वीज वापर कमी होण्यासाठी तसेच त्यावरील बिलावर होणाऱ्या वीजेच्या खर्चाची बचत करण्यासाठी जुन्या पंपाऐवजी अधिक कार्यक्षम पंप पुरविण्यासाठीची योजना त्वरीत पूर्ण करण्याकरीता महासंचालक (मेडा) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) दिनांक ४.१२.२०१५ रोजी सदर समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार महावितरण कंपनी ३००० कृषीपंपाचा पथदर्शी प्रकल्प खुल्या निविदेव्दारे राबविणार आहे. त्यासंबंधीची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.